# संशोधन प्रबंधातील संज्ञा व संकल्पना

## अग्रहार

चालुक्य शासकांकडुन करमुक्त जमीन कर्तुत्ववान व्यक्तीला अथवा धार्मिक स्थळांना दानाच्या स्वरूपात दिली जाई. याला अग्रहार असे म्हणत. चालुक्य राजा त्रैलोक्यमलने बोधन येथे जात असतांना लंजवाड येथे काही काळ वास्तव्य केले. या वास्तव्यादरम्यान त्याने चाउंड प्रभू नावाच्या व्यक्तीस बोरगी चाळीस प्रांतातील लंजवाड हे गाव करमुक्त करून (अग्रहार) दिल्याचा उल्लेख इ.स. 1057 च्या लंजवाड शिलालेखात आलेला आहे.

## अब्बे

कानडी शब्द, कल्याणी चालुक्य कालखंडात दक्षिण भारतात स्त्रीयांच्या नावामध्ये 'अब्बे' असे नाव लावले जात असे. नोळंब राजवंशातील दिलीप राजाची राणी चिन्हकब्बे हिच्या नावामध्ये 'अब्बे' असा शब्दप्रयोग इ.स. 1032 च्या कोप्पलच्या शिलालेखात दिसतो.

## अष्टावरण

वीरशैव लिंगायतांचे तत्त्व. गुरू, लिंग, जंगम, पादोदक (तीर्थ) प्रसाद, विभूती, रूद्राक्ष आणि मंत्र या तत्त्वांचा समावेश वीरशैव लिंगायत अष्टावरणात करतात.

## अनुभव मंडप

बसवेश्वर व त्यांच्या शरणांचे (अनुयांयी) दैनंदिन विचार–विनिमयाचे स्थळ. बसवेश्वरांचे अनुयांयी विविध जातीधर्माचे होते. दैनंदिन जीवन जगत असतांना येणारे विविध अनुभवांवर आधारित चर्चा येथे केले जाई. हे अनुभव वचनांच्या माध्यमातून लिखित स्वरूप चर्चेअंती त्या वचनांना प्राप्त होई. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय इत्यादी विषयांवर सखोल चर्चा केली जाई. या मंडपाची सदस्य संख्या साधारणतः तीनशे इतकी सांगितली जाते. या अनुभव मंडपाचे पहिले अध्यक्ष अल्लमप्रभु हे होते.

## उर

व्यापारिक संघटना. कल्याणी चालुक्या काळात प्रामुख्याने अंतर्गत व्यापार 'उर' या व्यापारी संघटनांकडे होते. ही संघटना धार्मिक व सामाजिक कार्यासाठी संपत्ती जमा करण्याचेही कार्य करत असे.

## कोईलू

पाणी उपसणाऱ्या यंत्राना दहाव्या बाराव्या शतकात कोईलू (Koylu) असे म्हणतात. आधुनिक रहाटासारखे हे पाणी उपसण्याचे यंत्र होते. याला **ओक्कना** अथवा **तरू** या नावानेही तत्कालीन लोक परिचित होते.

## केरे

याचा उल्लेख शिलहार राजा अरिकेसरीच्या ठाणे ताम्रपटात व इ.स. 1134 च्या सोमेश्वर तिसऱ्याच्या ताम्रपटातही येतो. किट्टेल यांच्या मते, केरे म्हणजे कृत्रिम रितीने तयार केलेले 'तलाव' होय. कल्याणी चालुक्य काळात दगडांचा वापर करून शासन कर्त्यांनी अनेक तलाव निर्माण केले होते.

## कालामुख

10 व्या ते 12 व्या शतकातील प्रसिद्ध शैव तांत्रिक पंथ, पाशुपत पंथाची उपशाखा. कल्याणी चालुक्य काळात राज्यकर्ते व प्रशासकांकडून विपूल प्रमाणात देणग्या दिल्याचे उल्लेख तत्कालीन कोरीव लेखांमधून येतो. भांडारकरांच्या मते, कालामुखी आचार्य आपल्या कपाळावर काळया तीन आडव्या रेघा ओढत. यामुळे त्यांना 'कालामुख' असे म्हटले जाते. ब्रह्मराशी व सिंहराशी असे दोन पोटभेद पुढे या संप्रदायात निर्माण झाले. या संप्रदायातील आचार्यांनी धार्मिक कार्यासोबतच शैक्षणिक कार्यही केलेले तत्कालीन कोरीव लेखांतून आढळते. बाराव्या शतकानंतर या संप्रदायाचा प्रभाव कमी होवून वीरशैव लिंगायत संप्रदाय समाजात लोकप्रिय झाला.

## कल्याणक्रांती

वीरशैव लिंगायत महात्मा बसवेश्वरांनी धार्मिक कार्यासोबतच सामाजिक कार्यही केले. त्यांच्या या कार्यात सहभागी होण्यासाठी समाजातील विविध स्तरावरील लोकही एकत्र आले. बसवेश्वरांना जातीभेद व उच्च–निच्चता मान्य नव्हती. त्यांनी जन्माने चांभार

असलेल्या हरळय्याचा मुलगा शिलवंत व जन्माने ब्राह्मण असलेल्या मधुवरसाची कन्या कलावती यांचा आंतरजातीय विवाह लावला. परिणामी परंपरावाद्यांनी या संदर्भात बसवेश्वर व त्यांच्या अनुयायांविरोधी तक्रार कलचुरी राजा बिज्जलाकडे केली. बिज्जलाने मधुवरस व हरळय्या यांचे डोळे काढण्याची शिक्षा ठोठावली. पुढे यांना ऐळ्ळेहोट्टे (मृत्यु होईपर्यंत तिचे पाय बांधून ओढण्याची शिक्षा) शिक्षा झाली व त्यातच त्यांचा मृत्यु झाला. हे बसवेश्वरांच्या अनुयायांना आवडले नाही. त्यांच्याकडून कलचुरी राजा बिज्जलाचा वध केला जातो. परिणामी राजाचे सैनिक व बसवेश्वरांच्या अनुयायांमध्ये तीव्र संघर्षास प्रारंभ होतो. ही घटना राजधानी कल्याण येथे घडल्याने या घटनेला कल्याण क्रांति असे म्हणतात परंतु 'कल्याणी' शब्द प्रचलित झाल्याने वापरला आहे.

## गवुंड आणि हेग्गडे

कल्याणी चालुक्यकालीन शहरी प्राधीकरणातील 'विश्वस्त' यांचे प्रशासकीय उच्च आधिकाऱ्याशी संबंध असतं. स्थानिक व प्रांतीय प्रशासनातील महत्वाचा दुवा.

## गृह

कल्याणी चालुक्य राजा सत्याश्रयाच्या काही कोरीव लेखात **गृहहस्त** किंवा **हस्त** असा शब्दप्रयोग आढळतो.  शं.गो.तुळपुळे यांच्या मते गृह म्हणजे चौरस. (Square) असा आहे.

## घटिका

कल्याणी चालुक्य कालीन कर्नाटकातील उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था. अशा संस्थामधून धार्मिक, प्रशासकीय व लष्करी शिक्षण दिले जाई. कल्याणी चालुक्यांच्या राज्यात 'नागाई' हे दक्षिण भारतातील प्रसिध्द घटीका होते. या ठिकाणी वेदाचा अभ्यास करण्यासाठी 200 विद्यार्थी शास्त्राच्या अभ्यासासाठी 50 विद्यार्थी यांना शिकविण्यासाठी मुख्य तीन शिक्षक शिवाय अनेक भट्ट व यांच्या मदतीसाठी 257 कर्मचाऱ्यांचा ताफा होता. असा उल्लेख म्हैसुरच्या शिलालेखातून येतो.

### जंगम

वीरशैव लिंगायत धर्मप्रसारक व मार्गदर्शक. 'शिवाला जो आपले आत्मस्वरूप मानतो तो जंगम होय.' असे रेणूकाचार्यांचे मत आहे. जंगमाला वीरशैव लिंगायत चरेलिंग समजतात.

### नौलंब/नोळंब वंश

कल्याणी चालुक्यांचे प्रमुख मांडलिक सत्तापैकी एक मांडलिक सत्ताधारी वंश. कर्नाटक प्रातांतील नौलंब वाडी बत्तीस हजार ही त्यांची राजधानी. त्यांची पूर्वकालीन राजधानी 'कंपीली' ही होती. दक्षिण कर्नाटक प्रांतावर त्यांनी राज्य केले होते. कल्याणी चालुक्यांशी त्यांचे वैवाहिक संबंध होते.

### बसदी

जैन धर्माशी संबंधीत संकल्पना. जैन तिर्थालयांना 'बसदी' असे म्हटले जाते. कल्याणी चालुक्य शासक, प्रशासकीय अधिकारी व व्यापाऱ्यांनी अनेक जैन बसदींना दान दिल्याचे तत्कालीन विविध कोरीव लेखांवरून उल्लेख येतात.

### ब्रह्मपुरी

विद्वान ब्राह्मणाला त्याचे धार्मिक व शैक्षणिक योगदान पाहुन एखादे अथवा एकापेक्षा अधिक करमुक्त गावे शासकांकडुन दानाच्या रूपात दिले जात असे. गोरठा शिलालेखानुसार (इ.स.1082) कल्याणी चालुक्य राजा त्रिभुवमल्लने रूद्रमिश्र वशिष्ट वंशातील रूद्रभट्ट महंताचे नातु रूद्रमिश्र याला शैक्षणिक व धार्मिक कार्याबद्दल भालकी 84 प्रांतातील आटळेचे गाव दक्षिणा म्हणुन दान दिल्याचा उल्लेख येतो.

### भट्ट

कल्याणी चालुक्य काळात विद्वान ब्राã्नांना समाजाकडुन 'भट्ट' असे म्हटले जाई. कल्याणी चालुक्याकालीन कोरीव लेखांमध्ये अनेक भटांचा उल्लेख येतो. विक्रमादित्य सहाव्याच्या हुलगी शिलालेखात (इ.स.1088) कामकाय गोत्राच्या नारायणभट्टोपाध्याचा मुलगा चौविधीभट्ट याचा उल्लेख येतो. या भट्टांना राजकीय, प्रशासकीय, व्यापारी व समाजाकडुन दान दिले जाई. समाजातील श्रीमंत भट्टांनीही दान धर्म केल्याचा उल्लेख हुलगी गावातील दुसऱ्या एका कोरीव लेखात येतो.

**मठ**

कल्याणी चालुक्यकालीन शैव धार्मिक स्थळ. पाशुपत, कालामुखी नाथ व वीरशैव लिंगायत संप्रदायाची मठ संस्थाने होती. या संस्थानांच्या माध्यमातून धार्मिक व शैक्षणिक कार्य चालत असत. मठाच्या प्रमुखाला 'मठाधिश' किंवा 'मठपती' म्हटले जाई. त्यांच्या नियंत्रणाखाली मठाची सर्व व्यवस्था पाहिली जात असे. मठाचे मठाधीश व त्यांच्या अनुयायांची निवासाची व्यवस्थाही मठ परिसरात उपलब्ध केली जाई. दैनंदिन खर्चासाठी राज्यकर्ते, प्रशासक, व्यापारी याशिवाय गावकरी दानधर्म करीत. या प्रकारचे उल्लेख तत्कालीन अनेक कोरीव लेखांमधुन आलेली आहेत.

**महाजन**

'महाजन म्हणजे मोठया आधिकाराची माणसे. कल्याणी चालुक्या काळात मोठया बाजारपेठेच्या व गावाच्या ठिकाणी 'महाजन' पद आसणारी व्यक्ती होत्या. सुंरूवातीला हे पद निधर्मी भुमिका बजावणाऱ्या श्रीमंत जमीनदार अथवा ब्राãनांना लावले जाई. नंतर मात्र शहरी प्रशासनातील व्यापारात गुंतलेल्या व्यक्तींना 'महाजन' असे संबोधण्यात येवु लागले. अशा महाजनांच्या समक्ष दानधर्म झाल्याचे उल्लेख उत्तरकालीन चालुक्यच्या अनेक शिलालेखातुन आलेला आहे.

**मत्तर / मत्तरू**

हा कानडी शब्द, भू–मापनाचे हे एक परिमाण असावे. 'मत्तरू' याचा अर्थ भूमितून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या आधारे एक परिमाण अशी व्याख्या डॉ. आळतेकरांनी केलेली आहे. तिलगुंडी लेखामध्ये एका मत्तरूतून दोन खंडूग (चाळीस मण) उत्पन्न मिळते असे सांगितले आहे.

**माना**

मानवी शक्तीपेक्षा बलशाली असणारी 'नैसर्गिक शक्ती' जी दृष्य रूपात नैसर्गिक घटकांच्या माध्यमातुन दिसते तिला 'माना' असे म्हणतात. वैदिक व वैदिकपुर्व कालखंडात व आदिम समाजात मानाशक्तीकडे आदरयुक्त भितीने पाहिले जाई.

## यातू

यातु म्हणजे, 'गुप्त नैसर्गिक शक्ती' ज्या शक्तीला विशिष्ट तंत्राच्या माध्यमातुन वश करता येते अशी धारणा प्राचीन काळापासुन मानवी मनात निर्माण झालेली आहे. तांत्रिक संप्रदायांमध्ये अशा यातु विद्येला महत्त्व दिले जाते.

## लोकन्हावी

कल्याणी चालुक्य राज्य कालखंडात दक्षिण भारतात शेतकऱ्यांशिवाय समाजातील न्हावी, सोनार, गावंडु, खलाशी, धोबी, माळी, देवदासी इ. समाज वर्गही आपल्या व्यवसायांशिवाय शेती कसत असत. चालुक्यांच्या चिकुर्डे, मरमुरी व मिरज कोरीव लेखात शेती करणाऱ्या न्हाव्यांचा उल्लेख 'लोकन्हावी' असा आलेला आहे.

## वचन

वीरशैव लिंगायत बसवेश्वर व त्यांच्या अनुयायांनी तत्कालीन लोकप्रिय कन्नड भाषेच्या माध्यमातून ओवीबद्ध रचना केली. त्या वचनांना वीरशैव लिंगायत 'वचन' असे म्हणतात. फ.गु.हळकट्टी यांनी 19 व्या शतकात या वचनांचा शोध लावल्याचे मानले जाते. वीरशैव लिंगायतांची आचार–विचार, तत्त्वज्ञान या वचनांमध्ये सामावलेले आहेत.

## वहिवाट

कल्याणी चालुक्य कालखंडात शेतकऱ्यांच्या जमीनीची मशागत कुळांकडुन ंकेली जाई अशा भागधारक कुळांना 'वहिवाट' असे म्हटले जाई.

## वज्जीवंश

कल्याणी चालुक्यांचे महाराष्ट्रातील मांडलिक सत्ताधीश कल्याणी चालुक्यांच्या अनेक कोरीव लेखात यांचा उल्लेख येतो. संशोधकांच्या मते हा वंश मुळचा कर्नाटक प्रातांतील रोणा प्रदेशातील असावा. इ.स. 1047 च्या तडखेल शिलालेखात यांची वंशावळ कोरण्यात आलेली आहे. या वंशातील नागवर्मा हा प्रसिध्द राजा होता. कदाचित यांची राजधानी नांदेड जिल्हयातील तडखेल ही असावी.

## वन्हीकुल

सुर्यवंशी राजकुळ. स्वतःची अग्नीतून उत्पत्ती झाली असा सांगणारा राजवंश. कल्याणी चालुक्यांचे मांडलिक. नांदेड जिल्हयातील होट्टल अथवा होटूळ हे यांच्या

राजधानीचे गाव असावे. या वंशाची माहिती होट्टल, करडखेल व परिसरातील उपलब्ध शिलालेखावरून प्राप्त होते. गोदावरी व मांजरा या नंदयाच्या दुआबात यांची सत्ता होती. या वंशात रब्बलदेवीसारख्या काही स्त्रिया प्रशासकपदी कार्य केलेले होते.

### विभूती

वीरशैव लिंगायत अष्टावरण तत्त्वज्ञानातील एक घटक. 'विभूती' म्हणजे एक प्रकारचे पांढऱ्या रंगाचे भस्म अथवा चुर्ण. धार्मिक प्रसंगी याचा वापर शरीरावर पंधरा ठिकाणी तीन आडव्या रेघा ओढण्यासाठी केला जातो.

### शरण

बाराव्या शतकात बसवेश्वरांच्या अनुयायी व सहकाऱ्यांना 'शरण' असे म्हटले जात असे. शरण हा शब्द प्रयोग आदर दाखवणे या अर्थानेही वापरला जाई. उदा. 'शरणु शरणार्थी'

### शरणसाहित्य

बसवेश्वरांच्या शरणांनी (अनुयायी) निर्माण केलेल्या साहित्य रचनेला 'शरणसाहित्य' असे म्हटले जाते. हे साहित्य कन्नड या लोकभाषेत निर्माण झाले होते.

### शिंदीलोन

भू–गर्भात सापडणारा मिठासारखा खारट खडक दहाव्या व आकराव्या शतकात दख्खनच्या पठारात कांही ठिकाणी असे खडक भुगर्भात उपलब्ध होते. या खडकांचा मिठासारखा व्यापर केला जाई.

### षट्स्थळ

वीरशैव लिंगायत तत्त्वज्ञानातील आचरण विषयक तत्त्व, स्थळ म्हणजे स्थान, अवस्था किंवा पायरी. वीरशैव लिंगायतांच्या मते साधकांच्या ध्येयापर्यंत म्हणजे ऐक्य स्थळापर्यंत पोहचण्यासाठी व जीव शिवाचे सामरस होण्यासाठी वाटेत एक–एक स्थळ पार करून पुढच्या स्थळात प्रवेश करावे लागते, असे सहा स्थळ आहेत. भक्त, प्रसादी, प्राणलिंग, शरण, ऐक्य यांना वीरशैव लिंगायत 'षट्स्थळ' असे म्हणतात.

## सबदी

नाथप्रवर्तकांनी रचलेल्या ओव्यांना 'सबदी' असे म्हणतात. मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ यांच्या सबदी सर्वाधिक आहेत. या सबदी लोकभाषेतून निर्माण केलेल्या होत्या. त्यांचे स्वरूप साधे, सरळ व सुलभ होते. या सबदीच्या माध्यमातून नाथ संप्रदायी विचार व तत्त्वज्ञान सर्वसामान्यापर्यंत पोहचले.

## हस्त

हे ही भूमापनाचे परिमाण. कल्याणी चालुक्य राजा सत्याश्रयाच्या चिकुरडे व मिरज ताम्रपटात 'हस्त' असा शब्दप्रयोग केलेला दिसतो. शं.गो.तुळपुळे यांच्या मते हस्त म्हणजे 'एका हाताइतके अंतर' या आधारे जमिनीचे मोजमाप केले जाईल.

## श्रेणी

'श्रेणी म्हणजे व्यापारी संघटना' कल्याणी चालुक्य कालखंडात विविध व्यवसायीक व व्यापाऱ्यांच्या संघटना होत्या. या सघटना (श्रेणी) मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही भाग (शासकीय करांशिवाय) सामाजिक व धार्मिक कार्यासाठी खर्च करीत असत. कल्याणी चालुक्या काळात म्हैसुर शिलालेखानुसार 'देश सलात्तु गंडा' ही सर्वात मोठी व्यापारी श्रेणी होती.